59

**राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्थानिक संस्था इत्यादींसाठी नॅशनल इन्फॉरमेटिक सेंटरच्या (NIC) ई-ऑफीस प्रणालीचा वापर**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
शासन निर्णय क्रमांक : मातंसं/२०१२/प्र.क्र.२५३/३९
मंत्रालय - मुंबई ,४०० ०३२.
दिनांकः ९ ऑगस्ट, २०१२

**वाचा** : शासन निर्णक्रमांकः मातंस ,/२०१२ /प्र.क्र. २५३/३९ दि. ६ ऑगस्ट, २०१२

**शासन निर्णय :-**

उपरोक्त संदर्भाधीन दि. ६ ऑगस्ट, २०१२ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये नॅशनल इन्फॉरमेटिक सेंटरच्या ई-ऑफीस प्रणालीचा वापर करण्याबाबत निर्णय झालेला आहे. याच अनुषंगाने शासनाने सदर प्रणालीचा वापर राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील संस्था उदा. स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, उर्जा विभागा अंतर्गत चार कंपन्या इत्यादींचा देखील यामध्ये अंतर्भाव करण्यात येत आहे. त्यांनी त्यांच्या कार्यालयातील कामकाज २ ऑक्टोबर, २०१२ पासून ई-ऑफीस प्रणालीद्वारे करणे अनिवार्य आहे.

मंत्रालयातील सर्व विभागांमध्ये कार्यालयीन कामकाज ई-ऑफीस प्रणालीद्वारे दि. १ जानेवारी, २०१३ पासून करणे अनिवार्य राहील. तत्पूर्वी सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, नियोजन विभाग, विधी व न्याय विभाग यांनी त्यांच्या कार्यालयाकरिता सदर प्रणालीद्वारे कामकाजाची सुरवात २ ऑक्टोबर, २०१२ पासून सुरु करण्यात येईल. दरम्यानच्या कालावधीत या प्रणालीच्या वापराचे प्रशिक्षण, त्यासंबंधी जागृती, पायाभूत सुविधांची निर्मिती, प्रणालीचा वापर करण्यासाठी क्षमतेची निर्मिती इत्यादी बाबी करण्यात याव्यात.

वरील प्रणालीचा वापर करण्याकरिता राज्यातील नॅशनल इन्फॉरमेटिक सेंटरच्या राज्य सूचना विज्ञान अधिकारी, नविन प्रशासकीय भवन, ११ वा मजला, मंत्रालय, मुंबई दुरध्वनी क्र. ०२२-२२०४ ६९३४, फॅक्स क्र. ०२२-२२८५ ३५६२ व ई-मेल आय.डी. siomsu@nic.in वर संपर्क साधावा.

मंत्रालयीन विभागांनी आपल्या नियंत्रणाखाली सर्व मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निदर्शनास प्रस्तुत शासन निर्णय आणावा आणि त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

(60)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे त्याचा संगणक संकेतांक 201208091655430100 असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

(राजेश अग्रवाल)
**महाराष्ट्र शासनाचे सचिव**

**प्रति,**
**राज्यपालांचे सचिव,**
**मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,**
**उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,**
**सर्व विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य**
**विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय,**
**मुख्य सचिव. महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई,**
**अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,**
**सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.**
**मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपन्या इत्यादी**
**महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिद्धीकरिता ५ प्रती)**
**ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधानभवन,**
**मुंबई – ४०० ०३२ (१० प्रती)**
**निवड नस्ती,**